**जिल्हा परिषद अहिल्यानगर,**
**शिक्षण विभाग (प्राथमिक)**
**दुरध्वनी क्रमांक - 0241-2353694**
**ई मेल आयडी - ednprimary@gmail.com**
**पत्ता- नविन प्रशासकीय इमारत,अहिल्यानगर पिन कोड - 414001**

**जा.क्रं.शिक्षण/कार्या-2/आस्था-3/पदोन्न्ती/75/2026 दिनांक - स्वाक्षरी खाली नमूद प्रमाणे**

**विषय - श्रीम.साईलता कृष्णा सामलेटी गट शिक्षण अधिकारी पंचायत समिती नेवासा जि. अहिल्यानगर यांची शिक्षणाधिकारी गट-अ पदावर पदोन्नती झाल्याने कार्यमुक्त करणे व गट शिक्षण अधिकारी या पदाचा कार्यभार सोपविणे बाबत.**

वाचा: -1 महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,मा.उप सचिव,महाराष्ट्र शासन यांचे कडील आदेश क्रमांक निसूची-3625/ई-ऑफिस 1128523/प्रशा-2 दिनांक 02 फेब्रुवारी 2026

2.मा.आयुक्त (शिक्षण),महाराष्ट्र राज्य पुणे, यांचे कडिल आदेश क्रमांक आशिका/आस्था -अ/पदोन्न्ती/101/2026/1703781 दिनांक 03/02/2026

3.म.जि.प.प.स.अधिनियम 1961 मधील नियम 95 (2)(क)(तीन)

**-: आदेश :-**

उपरोक्त् संदर्भ क्र.1 चे आदेशान्वये **श्रीम.साईलता कृष्णा सामलेटी गट शिक्षण अधिकारी पंचायत समिती नेवासा जि. अहिल्यानगर** यांना महाराष्ट्र शिक्षण सेवा (प्रशासन शाखा) गट-ब पदावर कार्यरत असणा-या अधिका-यांना निवडसूचीनुसार शिक्षणाधिकारी व तत्सम,महाराष्ट्र शिक्षण सेवा गट-अ (प्रशासन शाखा) या पदावर तात्पुरती पदोन्न्ती देण्यात आली असून त्यांना **शिक्षण अधिकारी (प्राथ.) जिल्हा परिषद,नाशिक** येथे पदोन्नतीने पदस्थापना देण्यात आली आहे.

संदर्भ क्रमांक 2 चे मा.आयुक्त,(शिक्षण) पुणे आदेशान्वये पदोन्नतीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी **श्रीम.साईलता कृष्णा सामलेटी गट शिक्षण अधिकारी पंचायत समिती नेवासा** यांना कार्यमुक्त करण्यात आले आहे. मला प्रदाण केलेल्या अधिकाराचा वापर करुन श्रीम.साईलता कृष्णा सामलेटी गट शिक्षण अधिकारी पंचायत समिंती नेवासा जि.अहिल्यानगर या पदाचे कर्तव्य व जबाबदारी नियमित गट शिक्षणाधिकारी हजर होईपर्यंत अथवा पुढील आदेश होईपर्यंत प्रशासकीय कामकाजाचे सोईच्या दृष्टीने श्री संजय विठ्ठल कळमकर विस्तार अधिकारी (शिक्षण) पं.स. नेवासा यांचे कडेस सोपविण्यात येत आहे.

श्रीम.साईलता कृष्णा सामलेटी गट शिक्षण अधिकारी पंचायत समिती नेवासा यांना स्वाक्षरी खाली नमूद तारखेपासून पदोन्न्ती दिलेल्या ठिकाणी हजर होण्यासाठी कार्यालयीन वेळेनंतर कार्यमुक्त करण्यात येत आहे.गट शिक्षण अधिकारी पंचायत समिती नेवासा जि. अहिल्यानगर या पदाचा कार्यभार तात्काळ हस्तांतरीत करुन पदोन्नती ठिकाणी रुजू व्हावे. सदर आदेशाची त्वरीत अंमलबजावणी करण्यात येऊन कार्यवाहीचा अहवाल तात्काळ या कार्यालयास विनाविलंब सादर करावा. सदरचा आदेश अहमदनगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक 202602091600100 असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 09-02-2026 19:27:35

**आनंद भंडारी, (भाप्रसे)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अहिल्यानगर**

प्रति-

1 **श्रीम.साईलता कृष्णा सामलेटी गट शिक्षण अधिकारी पंचायत समिती नेवासा**

2. श्री. संजय विठ्ठल कडनार, विस्तार अधिकारी (शिक्षण) पंचायत समिती नेवासा.

2/-गट शिक्षण अधिकारी पंचायत समिती नेवासा जि.अहिल्यानगर या पदाचा कार्यभार हस्तांतरीत करुन घेऊन आपले मुळ पदाचे कार्यभारासह गट शिक्षण अधिकारी, नेवासा या पदाचे अतिरिक्त कर्तव्य सांभाळावे.प्रकरणी तक्रार उद्भवणार नाही याची गांभिर्याने दक्षता घ्यावी.

प्रत- माहितीस्तव सविनय सादर

1 .मा.आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे

2. मा.विभागीय शिक्षण उपसंचालक,पुणे विभाग पुणे

3.मा.जिल्हा कोषागार अधिकारी, अहिल्यानगर

4.गट विकास अधिकारी पंचायत समिती नेवासा

**स्वाक्षरी/-**
**आनंद भंडारी, (भाप्रसे)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अहिल्यानगर**